डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

**संदर्भ : रासेयो/२९७/२०१८** **दि. ०८/१०/२०१८**

**प्रति,**

**मा. प्राचार्य**

**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**फक्त पुणे जिल्हा (पुणे शहर व पुणे ग्रामीण)**

**विषय : युवा माहिती दूत प्रशिक्षण कार्यशाळेबाबत**

मा. महोदय/महोदया,

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे तयार करण्यात आलेल्या 'युवा माहिती दूत' या मोबाईल ॲपद्वारे योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत महाविद्यालयांना सूचित करण्यात आलेले होते. यामध्ये प्रत्येक महाविद्यालयामध्ये एक मार्गदर्शक नेमायचा असून, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वतः या ॲप्लीकेशनवर स्वतःची नावनोंदणी करावयाची आहे. सहा महिन्याच्या कालावधीत किमान ५० प्रस्तावीत लाभार्थ्यांच्या घरी जावून त्यांच्याशी संपर्क साधून, त्यांच्यासाठी लागू असणाऱ्या योजनांची माहिती त्यांना देतील.

'माहिती दूत' हे ॲप Google play store मधून डाऊनलोड करून व त्याद्वारे कार्यवाही रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येणार आहे. या करिता महाविद्यालयांना User-ID व Passward माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कार्यालयातून ईमेल द्वारा पाठवण्यात आलेले आहेत.

सदर ॲपवर माहिती कार्यक्रम अधिकाऱ्यांद्वारे भरण्यात येणार आहे. कार्यक्रम अधिकाऱ्यांकरिता महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे 'युवा माहिती दूत प्रशिक्षण कार्यशाळा' दि. १२ ऑक्टोबर २०१८ रोजी संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात आलेली आहे. याकरिता आपल्या महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी यांना दि. १२ ऑक्टोबर २०१८ रोजी, दु. १.३० वाजता वरील ठिकाणी पाठवण्याविषयी सूचित करावे. सहभागी प्राध्यापकांचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

**Website :** http://www.unipune.ac.in/nss **Email :** nss@pun.unipune.ac.in, nss@unipune.ac.in